# Visual MELODY

Volume 24
Quarterly Issue
1st December 2025

THE RAVI PARANJAPE STUDIO

**E-Magazine about Visual Arts in free India**
By **- The Ravi Paranjape Studio**

» **Color Pencil Work of**
Artist Ravi Paranjape



» **Artist in Spotlight**
Kirti Behal

© All paintings and illustrations used in this issue are duly acknowledged.

# Visual MELODY

***"Absorb the Beauty and Present it Beautifully"***
*- Artist Ravi Paranjape*

*Visual Melody is a FREE quarterly eMagazine offered by The Ravi Paranjape Studio. It introduces readers to brilliant artists from various fields of visual art, spanning both past and present generations. The inaugural issue was published on 8th October 2019 dedicated to the legendary painter Madhavrao Satavlekar. Since then, each edition of Visual Melody has continued to feature the work and legacy of iconic artists.*

***Visual Melody FREE Subscription Link***
*www.raviparanjape.org/visual-melody*

***Credits***
*Editor : Rahul Deshpande*
*Art Direction: Sunil Gokarn*
*Design: Vinayak Chhatre*
*Publishing: Varsha Pendse*

*Marathi Article : Rahul Deshpande*
*English Translation : Varsha Pendse*

---


***The Ravi Paranjape Studio***

*The Ravi Paranjape Studio, located in Model Colony, Pune, is a privately owned and managed space with a mission to carry forward the vision of design-based culture as envisioned by artist Ravi Paranjape. This is a non-commercial endeavor. The studio actively encourages and nurtures artistic talent through various initiatives. Its art gallery and open space are made available for art-related events, supporting the creative community in a meaningful way.*

*1 Rutika, 1098/5-A Model Colony*
*Shivaji Nagar, Pune 411016*
*+91 9423562530 abhijatkala@gmail.com www.raviparanjape.org*

---

*All published information and images published in this eMagazine are duly acknowledged and copyright remains with the respective parties.*
*This eMagazine is free toshare as-is. No part of this eMagazine shall be reproduced or shared in parts or used in any other way than intended*




“Published by Jyotsna Prakashan, from the first moment you hold this heavy book in your hands, you know that it carries the weight of a lifetime's journey of a legend.”

— *Harshad Rajadhyaksha,*
*Chief Creative Officer, Ogilvy India*

raviparanjape.org/books

## या अंकात

या अंकात आपण चित्रकार रवी परांजपे यांच्या कलर पेन्सिल माध्यमातल्या कामाची वैशिष्ट्ये पाहणार आहोत. कलर पेन्सिल हे सर्वसाधारणतः लहान मुलांसाठीचे किंवा हौशी कलाकारांचं चित्रकला माध्यम समजले गेले आहे. मात्र श्री. रवि परांजपे यांनी या माध्यमातून अनोखे चित्रसंचित निर्माण केले आहे. या माध्यमाला त्यांनी कलात्मक दृष्ट्या एक नवी उंची दिलेली आढळते. आपल्या शैलीदार कलाअभिव्यक्तीने साकारलेल्या कलाकृतींचे स्वतंत्र चित्रप्रदर्शन करून या माध्यमाला कलाप्रवाहात प्रतिष्ठा दिली आहे. चित्रकार म्हणून त्यांचे हे योगदान खूप महत्त्वाचे आहे असे जाणवते.

## In this edition

In this edition, we highlight artist Ravi Paranjape's color pencil works. Color pencils, often regarded as a medium for children or hobbyists, were used by him in a novel and artistic way. He created an extraordinary collection of works in this medium and elevated it to new artistic heights. Through an independent exhibition devoted exclusively to color pencil works, he gave the medium its rightful place in mainstream art.



# चित्रकार रवी परांजपे
## कलर पेन्सिल चित्रसंपदा

चित्रकार रवि परांजपे यांची चित्रसंपदा विपुल आहे. त्यांची ओळख एक शैलीदार कलावंत अशी आहे. रेखांकन प्रधान चित्रशैलीला त्यांनी विविध पैलूतून साकार केले. त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे जलरंग, तैलरंग, ॲक्रेलिक, पेस्टल, पोस्टर कलर, पेन अँड इंक, चारकोल, पेन्सिल कलर पेन्सिल अशा अनेकविध माध्यमांवर त्यांची हुकूमत होती. या सर्वच माध्यमांमध्ये त्यांनी विपुल चित्रनिर्मिती केली. उपयोजित कलेच्या क्षेत्रात तसेच स्वांत सुखात चित्रनिर्मितीतही त्या त्या विविध माध्यमांचा उपयोग केलेला आढळतो.



त्यांच्या चित्रसंपदेचा माध्यमाची निवड आणि रंगलेपन पद्धती या दृष्टिकोनातून विचार करता एक महत्त्वाची गोष्ट आढळते, ती म्हणजे त्यांनी प्रत्येक माध्यमातून काम करताना पारंपारिक पद्धतींचा वापर केला आहे. परंतू त्याचबरोबर त्या माध्यमांची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन अनेक नवीन सृजन शक्यतांचा शोधही त्यांनी घेतला आहे. यातून तयार झालेल्या वेगळ्या रंगपद्धतींचा वापर करून आपल्या अभिव्यक्तीच्या कक्षा रुंदावल्या आहेत हे जाणवते. माध्यमांशी त्यांचा चालू असलेला हा सर्जक संवाद खूप महत्त्वाचा आहे.
आपल्या रेखांकन प्रधान चित्रशैलीशी त्यांनी या संवादाची चांगल्या पद्धतीने सांगड घातलेली जाणवते. कलर पेन्सिल हे असेच एक खूप दुर्लक्षित किंवा सर्वसाधारणतः लहान मुलांसाठीचे चित्रकला माध्यम समजले गेले आहे. मात्र श्री. रवि परांजपे यांनी या माध्यमातून अनोखे चित्रसंचित निर्माण केले आहे.

या माध्यमाला त्यांनी कलात्मक दृष्ट्या एक नवी उंची दिलेली आढळते. आपल्या शैलीदार कलाअभिव्यक्तीने साकारलेल्या कलाकृतींचे स्वतंत्र चित्रप्रदर्शन करून या माध्यमाला कलाप्रवाहात प्रतिष्ठा दिली आहे. चित्रकार म्हणून त्यांचे हे योगदान खूप महत्त्वाचे आहे असे जाणवते.


R.P


Ravi Paranjpe


R.P







कलर पेन्सिल माध्यमात काम करताना त्यांनी विविध प्रकारचे चित्रविषय हाताळले आहेत. यामध्ये प्रामुख्याने आऊटडोर स्टडी, लँडस्केप्स असले तरीही त्यांनी स्टील लाईफ, इंटेरिअर व्ह्यूज, फिगर ड्रॉइंग असे विविध विषयही हाताळले आहेत. आउटडोर स्टडी आणि लँडस्केपसाठी कलर पेन्सिल वापरणे त्यांनी आपल्या विद्यार्थीदशेपासूनच सुरू केले. परंतु तेव्हा रेखांकन सराव आणि चित्ररचनेचा शोध हा त्यांचा उद्देश प्रामुख्याने जाणवतो.

त्या वेळेच्या रंगांच्या उपलब्धतेनुसार मर्यादित रंगामध्ये म्हणजेच एक किंवा दोन रंगांमध्येच ही चित्रं केलेली आढळतात. त्यानंतर मात्र सुमारे 1982 सालापासून त्यांची कलर पेन्सिल माध्यमातील चित्रं आढळतात. बोधचित्रकार म्हणून कार्यरत असताना आपल्या व्यस्त कार्यकाळात ते आवर्जून लँडस्केपसाठी सुट्टीच्या दिवशी वेळ काढत असत. यामध्ये शहरातील सौंदर्यपूर्ण जुन्या इमारती, गार्डन्स, मुंबईच्या आसपासच्या गावातील दृश्ये, मंदिरे, कोळी वस्ती, शेते, घरे, गल्ल्या, बाजार, दुकाने असे अनेक विषय त्यांनी आपल्या चित्रांसाठी निवडले. रेखांकनाला प्राधान्य, वेगळ्या चित्ररचनेचा शोध, अनोखे रंगभान, छाया-प्रकाश परिणाम यांना या चित्रांमध्ये श्री. रवि परांजपे यांनी महत्त्व दिलेले आहे.







कलर पेन्सिल माध्यमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे रेखांकन आणि रंग एकत्रच उमटतात. रेषा, आकार, बिंदू यांचा वापर ‘रेंडरिंग’साठी केला जातो. तसेच एका रंगावर दुसऱ्या रंगाची पेन्सिल फिरवून मिश्र रंग तयार करता येतो. आउटडोरला काम करण्यासाठी हे माध्यम सुलभ आहे. साधारणतः 11” X 15” या आकारात काम करणे सोयीचे ठरते. यापेक्षा मोठ्या आकारात काम करताना या माध्यमातून मर्यादा येतात.

श्री. रवि परांजपे यांनी या माध्यमात काम करताना रंगलेपनासाठी क्रॉस हॅच पद्धतीचा वापर केला. एका रंगाच्या रेषांवर दुसऱ्या रंगाच्या रेषा वापरून वेगळा रंग परिणाम मिळवला आहे. पॉईंटॅलीझम रंगपद्धतीचा हा एक वेगळा प्रयोग त्यांनी केला. या बरोबरीनेच त्यांनी बिंदू व भौमितिक आकारांचा वापर करून चित्रविषयाला अलंकारणाची जोड दिलेली आहे. यामुळे वास्तवदर्शी आकारांचे रूपांतरण होते. अलंकारिक आकारांच्या पुनरावृत्तीतून अनोखी पोतनिर्मिती घडून येते. त्यामुळे चित्रविषयाला वेगळे दृश्य परिमाण मिळते. तसेच पारंपारिक भारतीय चित्रशैली व लोककलांचे प्रतिबिंब आपल्याला या चित्रांमधून जाणवते.





या चित्रांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे परांजपे यांनी समोरील दिसणाऱ्या रंगांबरोबरच काही काल्पनिक रंगांचा वापर केलेला आढळतो. यामुळे चित्रातील रंगसंवेदना अधिक प्रभावी ठरतात.

श्री. परांजपे यांच्या कलर पेन्सिल चित्रपद्धतीचा विचार करताना एक गोष्ट जाणवते, ती म्हणजे सुरुवातीच्या काळात त्यांनी आउटडोर, लँडस्केप करताना रेखांकन आणि छाया-प्रकाशाच्या परिणामांना महत्त्व दिलेले आहे. आकार भरताना पारंपारिक पद्धतीने 'रेंडरिंग' केलेले आढळते. प्रत्यक्ष स्पॉटवरच चित्र पूर्ण केलेले आहे.

यानंतरच्या टप्प्यावर स्पॉटवर प्रथम मोठे आकार, छाया-प्रकाशाचे परिणाम याचे रेखांकन केले आहे आणि नंतर स्टुडिओमध्ये 'क्रॉस हॅचिंग', डार्क एक्ससेन्ट्स देऊन ते चित्र पूर्ण केलेले आढळते.

तिसऱ्या प्रकारात स्पॉटवर केलेल्या चित्राचा आधार घेऊन पूर्ण नवीन चित्र केलेले आढळते. यामध्ये त्यांनी रंगाच्या दृष्टीने स्वातंत्र्य घेतलेले आहे. तसेच बिंदू, रेषाखंड, भौमितिक आकार यांचा वापर करून वास्तवदृश्याला माफक अलंकारणाची जोड दिलेली आहे. याशिवाय आणखी एका पद्धतीची चित्रे त्यांनी केली आहेत, ज्यामध्ये नैसर्गिक आकार वापरून त्याचे रचनाचित्र केले आहे. काल्पनिक रंग, अलंकारण पोतनिर्मिती यांचा सुरेख वापर त्यांनी यामध्ये केला आहे.



कलर पेन्सिल माध्यमात श्री. परांजपे यांनी बोधचित्रे, कॅलेंडर डिझाईस आणि थंबनेल्सही केली आहेत. लहान मुलांच्या पुस्तकांसाठी केलेल्या बोधचित्रांमध्ये त्यांनी विकसित केलेले चित्रतंत्र वापरले आहे. कॅलेंडरसाठी त्यांनी स्पॉटवर केलेल्या लँडस्केपचा उपयोग केला आहे, ज्यामध्ये कलात्मक अविष्काराबरोबरच छपाई तंत्रासाठीही योग्य असे रंगसंयोजन केलेले आढळते. कलर पेन्सिल या तशा दुर्लक्षित कलामाध्यमाला श्री. रवि परांजपे यांनी लँडस्केप, बोधचित्र अशा कलाप्रकारातून अभिव्यक्ती सादर करून एक कलात्मक उंची प्राप्त करून दिली आहे. त्यांनी स्वत: या कला माध्यमातील कलाकृतींचे एक स्वतंत्र कलाप्रदर्शन करून या माध्यमाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. म्हणूनच त्यांची ही चित्रे आज कलारसिक आणि अभ्यासक यांच्यासाठी प्रेरणादायी ठरली आहेत.
















## Color Pencil Work of
## Artist Ravi Paranjape

Artist Ravi Paranjape's body of work is vast and rich. He was known as a painter with a distinctive style who brought the drawing-based approach to paintings through several novel techniques. Paranjape's extraordinary command over a wide range of mediums — watercolors, oils, acrylics, pastels, poster colors, pen and ink, charcoal, and color pencils — is a remarkable aspect of his extensive oeuvre. He created an abundance of paintings in each of these mediums, both in his professional assignments and in works made for his own creative joy.









Paranjape was inclined to using traditional techniques through most of his work, yet explored new creative possibilities within each medium. He developed unique color approaches that expanded the expressive scope of his art. His intimate dialogue with the mediums beautifully complemented his sketching-oriented style.

Color pencils, often regarded as a medium for children or hobbyists, were used by him in a novel and artistic way. He created an extraordinary collection of works in this medium and elevated it to new artistic heights. Through an independent exhibition devoted exclusively to color pencil works, he gave the medium its rightful place in mainstream art.

Paranjape explored various subjects in color pencils, primarily outdoor studies and landscapes, but he also used them for still life, interior views, and figure drawings. He started exploring color pencils for outdoor sketches during his student days, mainly to practice drawing and compositions. Due to the limited availability of the material then, those early works were often done in one or two tones.

His elaborate color pencil works became more visible from around 1982. Even while working full-time as an illustrator, he would make time on weekends or during holidays to paint landscapes. His favorite subjects included old architectural structures, gardens, village scenes around Mumbai, temples, fishing villages, fields, houses, lanes, markets, and shops. He stressed strong drawing skills, original composition, extraordinary color sense, and light-and-shadow effects in his paintings.

The most distinctive feature of the color pencils is that drawing and color appear together. Lines, shapes, and dots are used for rendering. Subtle shades can be created by layering different colors over one another. It's a great medium for outdoor work, perfectly suited for about 11" x 15" paper size, however larger works may pose limitations.

Ravi Paranjape often used the cross-hatching technique for coloring, applying one set of colored lines over another to create new tones. This was his creative personal twist on the traditional pointillist technique. He also used dots and geometric patterns to stylize his subjects, transforming realistic forms into semi-ornamental ones. He achieved unique textural effects that gave his compositions a distinct visual dimension through the repetition of forms.














His works reflects traditional Indian painting styles and folk-art motifs. Paranjape often incorporated imaginative hues in his paintings, along with the observed colors, to heighten the emotional and visual impact.





ravi paranjape 05



It is observed that in the beginning, Paranjape's outdoor and landscape works focused mainly on drawing and light effects, often completing the entire work on-site in a traditional rendering style. Later, he began sketching the broad shapes and tonal contrasts outdoors and then finished the works in his studio using cross-hatching and darker accents. In the next phase, he completely transitioned to painting based on a quick outdoor sketch, freely interpreting color and form with stylized ornamentation using dots, lines, and geometric shapes. In yet another approach, he built compositions using natural forms as abstract design elements, with imaginative color and rich textural ornamentation.

Artist Ravi Paranjape liberally used color pencils for illustrations, calendar designs, and thumbnails. He skillfully applied many of the artistic techniques he had developed in his fine art practice to his children's book illustrations rendered in color pencils. His calendar artworks often featured landscapes drawn on location, which he thoughtfully adapted for the printing process through meticulous color planning.





With his masterful use of color pencils in works ranging from illustrations to fine art, Ravi Paranjape gave this otherwise overlooked medium a new artistic stature. His independent exhibition of color pencil works established its place in the art world. His color pencil paintings continue to serve as an inspiration to art lovers and students alike.

# Artist in Spotlight


This section is dedicated to highlighting artists from the growing TRPS art community and their creative contributions.


**Kirti Behal**

Kirti began her artistic journey about ten years ago after moving from Mumbai to Pune, without any formal art education.

A lifelong hobbyist, she has always loved drawing and painting, particularly nature-themed subjects. Previously a school teacher and Headmistress, she held her first exhibition of watercolor paintings at The Ravi Paranjape Studio in 2025. With support from her painting mentor artist Anil Sigwan, and encouragement from her husband Vidur, this milestone marked the realization of a long-held dream.

View Kirti's work at @Kirti.behal.73





THE RAVI PARANJAPE STUDIO

# TRPS Library

**TRPS invites you to explore the treasure of 900+ rare books on art and art related topics from artist Ravi Paranjape's personal collection; Wealth of knowledge at your fingertips!**

**View the Online Catalog at**
*www.raviparanjape.org/trps-library*

## Library Hours

Saturday & Sunday - 11 AM - 5 PM

**Entry**

Rs. 20/- Per Person

*Library may remain closed for major studio events or major public holidays*

***1 Rutika, 1098/5-A Model Colony***
***Shivaji Nagar, Pune 411016***
***+91 9423562530 abhijatkala@gmail.com***
***www.raviparanjape.org***

---

- *Books are availab le at TRPS premises only. They shall not leave the TRPS premises at any time for any reason.*
- *Only the designated TRPS personnel has access to library cabinets.*
- *Check the digital catalog and bring the 'location code' of the book to the attendant. Please handle all items with utmost care and respect.*
- *Each person visiting the library must check-in and check-out with the attendant. Please return the books to the attendant personally before leaving. Please do not leave any items unattended.*
- *Each person will get one book at a time. You may return the first book and request another. You can view multiple books during your visit.*
- *TRPS Reserves the right to deny the library access to anyone, under unfavorable circumstances.*

THE RAVI PARANJAPE STUDIO

# art & gallery exhibition space

600 sq ft indoor art gallery

1000 sq ft of beautifully designed outdoor exhibition space

Ideal for individual or group art shows, workshops, art demos..

find your expression!

Inquire:
11 am to 7 pm
+91 9423562530

abhijatkala@gmail.com
raviparanjape.org

The Ravi Paranjape Studio
1 Rutika
1098/5-A Model Colony
Shivajinagar, Pune 411016

**Plan a visit to see the gallery and exhibition space**

Call/WhatsApp +91 9423562530
abhijatkala@gmail.com



Compliments from
**The Ravi Paranjape Studio, Pune**

For latest events please visit :
www.facebook.com/theraviparanjapestudio
Email: abhijatkala@gmail.com